बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.२०० ■ बुधवार ३० एप्रिल २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८
POST REGD.NO./DHL/53/24-26

आकर्षक लग्न पत्रिका
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकिट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900

# गैरव्यवहार रोखण्यासाठी पीक विमा योजनेत मोठे बदल
# दहशतवादी हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबियांना अर्थसहाय्य

**मुंबई, दि.२९- पिक विम्याचा लाभ कंपन्यांना नाही तर शेतकऱ्यांना मिळावा. पिक विमा योजनेत मागील काळात झाला तसा कोणताही गैरव्यवहार होणार नाही, याची काळजी घेण्यात येणार आहे. प्रवासी वाहतुक करणाऱ्या इलेक्ट्रीक वाहनांना मोठ्या प्रमाणात अनुदान देण्याचा, काही इलेक्ट्रीक वाहनांना विशिष्ट मार्गांवर टोलमुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबियांना ५० लाखाची मदत दिली जाईल. तसेच गरजवंत कुटुंबातील वारसाला शासकीय नोकरी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री मंडळाच्या बैठकीनंतर प्रसार माध्यमांना दिली.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक झाली. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह महायुती सरकारमधील सर्व मंत्री आणि राज्यमंत्री उपस्थित होते. यावेळी राज्य सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. मंत्रीमंडळ बैठकीच्या सुरूवातीला पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झालेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर मंत्रीमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. घेतलेल्या निर्णयांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसार माध्यमांना माहिती दिली. पहलगाम हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक सहाय्य म्हणून ५० लाख

**मंत्रिमंडळाचा निर्णय**

देण्यात येतील. त्यातही गरजवंत कुटुंबातील वारसांना शासकीय नोकरी देण्याचाही निर्णय घेतला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. हल्ल्यात मरण पावलेल्या संतोष जगदाळे यांच्या मुलीला नोकरी देण्याचा निर्णय कालच घेतला आहे. मंत्रीमंडळाच्या आजच्या बैठकीत आणखी ११ महत्वाचे निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**नवीन इलेक्ट्रीक वाहन योजना**

राज्य सरकारने (पान ४ वर)

## पो.अधि.श्रवण दत्त यांना सन्मानचिन्ह

नंदुरबार, दि.२९ (प्रतिनिधी)- पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांना उत्कृष्ट तपासाबद्दल तर एक पोलीस अंमलदार यांना उत्कृष्ट अभिलेखाबद्दल पदक जाहीर करण्यात आले. महाराष्ट्र पोलीस विभागात विविध प्रकारच्या प्रवर्गामध्ये केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल आणि उल्लेखनीय/प्रशंसनीय सेवेबद्दल राष्ट्रपतीचे पोलीस पदक, पोलीस पदक, पोलीस शौर्य पदक व पोलीस महासंचालकाचे बोधचिन्ह सन्मानचिन्ह आणि प्रशस्ती पत्राने सन्मानित करण्यात येते. त्या अनुषंगाने सन २०२४ या वर्षाकरीता उल्लेखनीय सेवेबद्दल महाराष्ट्रातील तब्बल ८०० पोलीस अधिकारी व अंमलदारांना पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे. (पान ४ वर)

# बिहारमधील महाबोधी महाविहार मुक्तीसाठी शहाद्यात आंबेडकरी अनुयायांचा मोर्चा; प्रांताधिकाऱ्यांना निवेदन



**शहादा, दि.२९ (का.प्र.)- बिहार राज्यातील भगवान बुद्धांना ज्ञानप्राप्ती झालेल्या ठिकाणच्या महाबोधी महाविहार मुक्तीसाठी शहादा येथील बौद्ध समाजबांधव व माणसाला माणूस म्हणून मानणाऱ्या बहुजन समाज बांधवांच्या उपस्थितीत मोर्चा काढण्यात आला.यावेळी प्रांताधिका-यांना महाबोधी महाविहार मुक्तीसाठीचे निवेदन देण्यात आले.**

मंगळवारी सकाळी दहाच्या सुमारास हजारोंच्या संख्येने बौद्ध समाजबांधव व माणसाला माणूस म्हणून मानणाऱ्या बहुजन समाजातील स्त्री-पुरुष प्रशिक बुद्ध विहार संभाजी नगर येथे जमा झाले होते. मोर्च्याच्या सुरुवातीला बोधाचारी युवर-ाज आगळे यांनी संपूर्ण मोर्चे कऱ्यांना त्रिशरण पंचशिल ग्रहण करायला सांगितले. त्यानंतर बुद्ध पूजा झाली. बुद्ध पूजेनंतर अडिक-पडिक लोकांच्या हक्कासाठी लढणारे चळवळीचे म्होरके दादाभाई पिंपळे यांनी साथीयो सलाम है या क्रांतीगिताने उपस्थित मोर्चेकऱ्यांच्या अंगात ऊर्जा निर्माण केली. त्यांच्या सोबत चळवळीचे सच्चे कार्यकर्ते चुनिलाल ब्राम्हणे, प्रदीप केदारे व गणेश वळवी यांनी साथ सहयोग दिला. त्यानंतर अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने मोर्चा प्रांत कार्यालयाकडे मार्गस्थ झाला. (पान ४ वर)



# दोन लाखांची रोकड लांबविणारा भामटा दोन तासात झाला गजाआड

**धुळे, दि.२९- शहरातील गांधी पुतळा जवळील बिस्मील्ला गादी भांडार दुकानाच्या मागील बाजुने प्रवेश करून दोन लाखांची रोख रक्कम, पॅनकार्ड चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी आझाद नगर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा शोध घेवून अवघ्या दोन तासांत मध्यप्रदेशातील मुळ रहिवासी ह.मु.जुने धुळ्यातील आरोपीला गजाआड केले.**

बिसमिल्ला गादी भांडारचे मालक कलीम सलीम तेली यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आझाद नगर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला. या गुन्ह्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गादी भांडार येथे काम करीत असलेला राकेश रामलाल सावले (वय ३४) रा.गरणगाव भगवानपुरा, जि.खंडवा मध्यप्रदेश ह.मु. वंजार गल्ली, पाटबाजाराच्या मागे जुने धुळे याला ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. राकेश सावले याच्याकडून दोन लाखांची रोख रक्कम, कलीम तेलींचे पॅनकार्ड, गादी भंडारचे व्हिजीटींग कार्ड, लोखंडी टॅमी असा एकुण दोन लाखांचा मुद्देमाल काढून दिला. ही कारवाई जिल्हा पो.अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. श्रीराम पवार, पोसई. अमरजीत मोरे, पोहेकॉ.देवरे, वाघ, चौधरी, हिरे, बोरसे, मोहिते, सुशिल शेंडे, हर्षल चौधरी यांनी केली.

## रेल्वेच्या धडकेत तरूणाचा मृत्यू

धुळे, दि.२०- शिंदखेडा तालुक्यातील चिरणे शिवारात एकोणावीस वर्षीय तरूणाला रेल्वेची धडक बसल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव जिल्हा एरंडोल तालुक्यातील पातरखेडा येथील एकोणावीस वर्षीय अर्जुन राजेंद्र महाले हा तरूण शिंदखेडा तालुक्यातील चिरणे शिवारात रेल्वे पोल क्र.२१४/१४-१६ दरम्यान रेल्वे समोर आल्याने गंभीर दुखापत झाली. ग्रामीण रूग्णालयात आणले असता डॉ. काटे यांनी तपासून मयत घोषित केले. याप्रकरणी शिंदखेडा पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ चौपदरीकरण

# भूसंपादित जमिन मालकांनी मोबदला स्वीकारावा : उपजिल्हाधिकारी अहिरे

**धुळे, दि.२९- राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ धुळे ते सोलापूर चौपदीरकरणातंर्गत धुळे तालुक्यातील तरवाडे, चांदे, विंचुर, शिरुड, जुनवणे, बोरविहीर, नरव्हाळ, गाडउतार, सावळदे, सौंदाणे, पिंपरी, मोहाडी प्र.ल. गटधारकांनी १५ दिवसांच्या आत मोबदला स्वीकारावा. असे आवाहन सक्षम अधिकारी (भूसंपादन) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्रमांक १ सीमा अहिरे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ धुळे ते सोलापूर चौपदीरकरण अंतर्गत धुळे तालुक्यातील तरवाडे, चांदे, विंचुर, शिरुड, जुनवणे, बोरविहीर, नरव्ह-ाळ, गाडउतार, सावळदे, सौंदाणे, पिंपरी, मोहाडी प्र.ल. गावातील भूसंपादीत गटांचे अंतिम निवाडे सक्षम प्राधिकारी ता उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्रमांक १ यांनी सन २०१६ ते २०२१ दरम्यान घोषित केले आहे. अशा भूसंपादीत जमिनीच्या गटधारकांना मोबदला स्वीकारण्याकामी (पान ४ वर)

## पालकमंत्र्यांच्या हस्ते होणार ध्वजारोहण

धुळे, दि.२९- महाराष्ट्र राज्याचा ६६ वा स्थापना दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ गुरुवार १ मे रोजी सकाळी ८ वाजता पोलीस कवायत मैदान, धुळे येथे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांचे हस्ते होणार आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिली आहे. या कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक, शहिद जवानांच्या पत्नी, वीरमाता, विरपिता, शौर्य पुरस्कार विजेते, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी, माध्यम प्रतिनिधी, इतर मान्यवर, विद्यार्थी आणि नागरिकांनी उपस्थित रहावे. जास्तीत जास्त (पान ४ वर)



# बेचाळीस लाखांचा गांजा जप्त चिलारेत एलसीबीची कारवाई

**शिरपूर दि.२९ (का.प्र.)- तालुक्यातील चिलारे येथील शेतातील घरामधून विक्रीसाठी केलेला गांजाचा साठा पोलिसांनी २८ एप्रिलला जप्त केला. धुळे येथील स्थानिक गुन्हे शाखा व सांगवी पोलिसांनी संयुक्तरित्या ही कारवाई केली असून एकूण ६०५ किलो गांजा जप्त करण्यात आला.**

स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक श्रीराम पवार यांना चिलारे येथे गांजाचा साठा केल्याची माहिती मिळाली होती. त्यांनी सहकाऱ्यांसह सांगवी पोलिसांना सोबत घेऊन चिलारे शिवारातील टिटवा गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर शेतातील घरावर छापा टाकला. त्यात प्लास्टिकच्या गोण्यांमध्ये गांजा भरल्याच आढळले. त्याचे वजन सहा क्विंटल पाच किलो भरले. या मुद्देमालाची एकूण किंमत ४२ लाख ३५ हजार रुपये आहे. संशयित शेतमालक रवींद्र गणेश पावरा (रा.चिलारे) याच्याविरोधात सांगवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक जयपाल हिरे, निरीक्षक श्रीराम पवार, उपनिरीक्षक अमित माळी, सुनिल वसावे, हवालदार आरीफ पठाण, पवन गवळी, पंकज खैरमोडे, मयूर पाटील, योगेश जगताप, जगदीश सूर्यवंशी, कमलेश सूर्यवंशी, राहुल गिरी, गीते, गुलाब पाटील, राजू डिसले, प्रकाश भिल, ग्यानसिंह पावरा, रोहिदास पावरा आदिंनी ही कारवाई केली.

# व्यापाऱ्याला जंगलात नेऊन मारहाण करणाऱ्या सहा दरोडेखोरांना अटक

**नंदुरबार, दि.२९ (प्रतिनिधी) - ठाण्यातील भंगार खरेदी करणाऱ्या दोघा व्यापाऱ्यांना आमिष दाखवून जंगलात नेऊन बेदम मारहाण करून रोकड लुटणाऱ्या सहा दरोडेखोरांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ५० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाला यश मिळाले आहे.**

दि.२३ एप्रिल २०२५ रोजी ठाणे येथील भंगार व्यापारी औरंगजेब सय्यद शेखावत सय्यद, यांना जामदा येथील दरोडेखोरांनी स्वस्तात भंगार देण्याचे बहाण्याने नंदुरबार येथे बोलावून मोटारसायकलीवर एका जंगलात घेऊन गेले. तेथे रोख रक्कम, मोबाईल, ऑनलाईन पेमेंट हे जबरीने घेऊन त्यांना जबर मारहाण केली म्हणुन नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पोल पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांच्या मार्गदर्शनाखलो स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी लागलीच जामदा या गावात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास रवाना केले. स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने जामदा, ता. साक्री जि. धुळे येथे जाऊन लाल (पान ४ वर)

## युवकाची गळफास घेवून आत्महत्या

धुळे, दि.२९- शिंदखेडा तालुक्यातील सोंडले गावातील बावीस वर्षीय युवकाने नायलॉन दोरीने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, सोंडले येथील अविनाश सतिलाल भिल (वय २२) हा त्याच्या राहत्या घरी लाकडी घराच्या छताला नायलॉन दोरीने गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला. परिसरातील नागरिकांच्या मदतीने खाली उतरवून खाजगी वाहनाने सोनगीर रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉ.एजाज हिरे यांनी तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी शिंदखेडा पोलीस स्टेशनला अमस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

# बाभळे येथील भिल कुटुंबाची जमिन परस्पर नावे करून घेतल्याची तक्रार

**धुळे, दि.२९- शिंदखेडा तालुक्यातील बाभळे येथील रामदास भिल, राजु भिल त्यांच्या बहिणी वेणुबाई आणि शाहनीबाई यांच्यानावे असलेली शेतजमीन परस्पर विकण्यात आली. या शेतजमीनीवर लखन ओंकार रूपनर यांच्या नावाची नोंद आहे. महसुल दप्तरी असलेल्या कागदपत्रात परस्पर बेकायदेशीरपणे नोंद करण्यात आली आहे. याप्रकरणी सक्षम कर्मचारी-अधिका-यांकडे तक्रार करण्यात आली पण दखल घेण्यात आलेली नाही. उदरनिर्वाहासाठी मिळालेली ही जमिन आमच्या ताबे उपभोगात मिळवुन द्यावी, अशी मागणी करणारे निवेदन मंगळवारी जिल्हा प्रशासनाला देण्यात आले.**

शिंदखेडा तालुक्यातील बाभळे येथील गंगाराम भिल यांना उदरनिर्वाहासाठी शासनाकडून जमिन देण्यात आली होती. गंगाराम भिल यांच्या मृत्युनंतर त्यांची मुले रामदार आणि राजु तसेच मुली वेणुबाई आणि शाहनीबाई यांची वारसम्हणुन नोंद झाली. परंतु गेल्या काही वर्षात भिल यांच्या नावे असलेल्या जमिनीवरील त्यांच्या मुलांची नावे बेपत्ता झाली. त्याऐवजी लखन ओंकार रूपनर (पान ४ वर)

## गौण खनिजाची वाहतूक ताब्यातील ट्रॅक्टर लंपास

**धुळे, दि.२९- साक्री तालुक्यातील अंबापूरकडून साक्रीकडे अवैधरित्या गौण खनिजाचा वाहतुक करणारे दोन ट्रॅक्टर ट्रॉलीसह मंडळ अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले दोन्ही ट्रॅक्टर अंबापूरच्या तिघांनी पळवून नेल्याची घटना घडली.**

शासकीय कामात अडथळा आणल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साक्री तालुका रोहोड येथील मंडळ अधिकारी सुनिल धोंडु साळुंखे यांनी दि.२८ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, अंबापूर गावातील राजेंद्र बापू मारनर, भटु चिंधा कारंडे, सुनिल धनराज कारंडे हे तिघे दोन ट्रॅक्टरच्या ट्रॉलींमध्ये प्रत्येकी एक ब्रास मुरूम गौणखनिजाची अवैध वाहतुक करतांना आढळून आले. पथकाने ताब्यात घेतलेले दोन्ही ट्रॉलीसह ट्रॅक्टर पळवून नेल्याने शासकीय कामात अडथळा आणला. यप्रकरणी साक्री पोलीस स्टेशनला तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# धुळ्यात पांडव प्लाझामधील बेकायदा बांधकाम थांबवा; रहिवाश्यांची मागणी

**धुळे, दि. २९ (प्रतिनिधी) : धुळे शहरातील रेल्वेस्थानक परिसरात असलेल्या पांडवा प्लाझा या इमारतीत काही व्यावसायिकांकडून बेकायदेशीर बांधकाम होत आहे. त्यामुळे या इमारतीतील काही व्यापारी आणि इतर नागरीकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. बेकायदेशीर बांधकाम करतांना सार्वजनिक स्वच्छतागृह बंद करण्यात आले आहे. अनेकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी बेकायदेशीर बांधकाम रोखले जावे, अशी मागणी इमारतीतील इतर व्यावसायिकांनी केली आहे.**

रेल्वेस्थानक परिसरातील पांडव प्लाझा या इमारतीत काही व्यावसायिकांकडून बेकायदेशी बांधकाम केले जात आहे. या इमारतीमधील मोकळया तसेच पार्कीगच्या जागेत परवानगी न घेता बेकायदेशीर बांधकाम केले जात आहे. बेकादेशीर बांधकामामुळे नागरीकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. बांधकाम (पान ४ वर)

## वार गावात नेत्र तपासणी शिबीर

धुळे, दि.२८- धुळे तालुक्यातील वार गावात सेवाभावी ज्येष्ठ नागरिक संघाच्या प्रयत्नाने शारदा नेत्रालयाच्या माध्यमातून नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबीरास दीडशे महिला व पुरूषांची नेत्रतपासणी करण्यात आली.शिबीरासाठी खान्देश फेस्कॉमचे ॲड.एम.एस.पाटील, भाऊसाहेब देवरे, गुलाबराव पाटील यांनी मार्गदर्शन केले. ज्येष्ठ नागरिक संघाचे बापु महाराज यांनी पाठपुरावा केल्याने शारदा नेत्रालयाचे व्यवस्थापक अमोल वानखेडे व त्यांचे चार ते पाच डॉक्टरांच्या समुहाने नेत्रतपासणी केली. यावेळी अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष स्व.प्राचार्य व्हि. के.भदाणे यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

# अक्षयतृतियेच्या पुर्वसंध्येला धुळ्यात लाखोंची उलाढाल बाजार तेजीत; घागरी, आंबे घेण्यासाठी ग्राहकांची गर्दी

**धुळे, दि.२९- अक्षयतृतीया निमित्त खानदेशात घागर पुजनाचा कार्यक्रम घडवीत पुर्वजांचे आशिर्वाद मिळविण्याचे प्रयतक होतो. त्यामुळे अक्षय तृतीयेच्या आदल्या दिवशी मंगळवारी शहराच्या बाजारपेठेत मध्यमस्वरूपाच्या मातीच्या घागरी घेण्यासाठी नागरीकाची गर्दी झाली होती. बाजारात ७० ते १०० रूपये किंमतीच्या घागरी विक्रीस आल्या. याशिवाय घागर पुजनाच्या वेळी लागणारे खरबुज, पुरणपोळीत वापरण्यात येणारे साहित्य आणि आंब्यांची मोठया प्रमाणात खरेदी झाली. अक्षयतृतीयेच्या खरेदीमुळे**



**धुळे शहराच्या बाजारपेठेला उर्जितावस्था प्राप्त झाली.**

धुळे जिल्ह्यासह खानदेशात अक्षयतृतीया साजरी करण्याची पुर्वीपासुनची परंपरा आहे. अक्षयतृतीयेच्या दिवशी घागर पुजन करून पुर्वजांचे आशिर्वाद मिळविले जातात. याशिवाय अक्षयतृतीयेपासुन शेतीच्या अर्थशास्त्राचे गणित मांडले जाते. अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर शेतीत राबण्यासाठी सालदाराची निवड केली जाते. तत्पुर्वी घरोघरी सकाळी घागर (पान ४ वर)

# पहलगाम हल्ला : रात्र वैऱ्याची आहे! भारतीय नागरिका, राजा सावध रहा!

**मंकी बात**
**किशोर आपटे**

जन्नत ए कश्मीर मधील पहेलगामच्या बेसन पठारावर पर्यटनासाठी गेलेल्या अश्राप नागरीकांवर अनपेक्षीत पणे अतिरेक्यांचा जिवघेणा हल्ला झाला. या दुर्दैवी हल्ल्यात महाराष्ट्रातील सर्वाधिक नागरीक बळी पडले आहेत. देशात नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तेवर आल्यापासून अतिरेक्यांचे अनेक हल्ले झाले, त्यात अनेक सैनिक शहिद झाले. मात्र आताचा हल्ला वेगळ्या प्रकारचा होता हे मान्य करावे लागेल. नि:शस्त्र नागरिकांना त्यांचा धर्म कोणता? हे विचारून आणि त्यानंतरही खात्री न पटल्याने त्यांची खतना झाली आहे की नाही याची खातरजमा करुन त्यांचा त्यांच्या बायको-मुलांसमोरच दिवसाढवळ्या नृशंसपणे खून करण्यात आला आहे. ही घृणास्पद कृती करणारे पोरसवदा वयाचे तरुण होते, त्यांच्याकडून हे कृत्य करवून घेणारांचे मनसुबे मात्र खूप खूनशी आणि पाताळयंत्री (कोल्डबल्डेड) म्हणतात तश्या प्रकारचे आहेत हे त्यातून स्पष्ट होते. या देशात धार्मिक यादवी व्हावी, देशभरातील लोकांचे काश्मीरबद्दलचे मत बदलावे, त्यांचे पर्यटन, स्थानिकांसोबत मिसळणे बंद व्हावे यासाठी दिर्घविचारपूर्वक हे घडविण्यात आले आहे. यातून पुन्हा काश्मीरी बेरोजगार होतील, भरकटण्यासाठी मजबूर होतील हा मनसुबा तर आहेच. पण सामान्य नागरीक जिवाच्या भितीने पुन्हा पर्यटनाला येणार नाहीत जेणेकरुन काश्मीर पुन्हा एकदा देशापासून तोडण्याची ही गहिरी साजीश आहे.

**देशाच्या एकजुटीवरचा हल्ला**

या काळ्याकुट्ट मनसुब्यांचा करावा तेवढा निषेध थोडाच आहे, त्याही पेक्षा या मनसुब्यांना उधळून लावायचे असेल तर त्यांना जे हवे आहे ते कधीच घडू देता कामा नये हे देखील लक्षात घ्यायला हवे. देशातील शांतता, बंधुभाव, भाईचारा नष्ट होवू देता कामा नये. त्यासाठी धार्मिक वाद विवाद जातीय तेढ बाजुला ठेवून एकजूट व्हायला हवे. तसे प्रयत्न वर्तन सर्वानीच करायला हवे. हा काही राजकीय विषय नाही. हा देशावरचा देशाच्या एकजुटीवरचा हल्ला आहे त्याला एकजूट होवूनच तोंड दिले पाहीजे. वेळोवेळी मुंबई असो किंवा देशातील कोणताही भाग असो अश्या प्रसंगी सामान्य नागरीकांनी ज्या समजूतदारपणाचे माणुसकीचे तसेच धैर्य आणि साहसाचे दर्शन घडविले तसेच यावेळी देखील झाले आहे. या देशाच्या साध्या घोडेवाल्याने या अतिरेक्यांचा समोरा समोर निशस्त्र सामना करण्याचा प्रयत्न करून त्यांच्या मनसुब्याना घोडे लावले आहेत! त्या आदिल नावाच्या काश्मीरी तरुणाने आपल्या कृतीतून जीवाचे बलिदान देवून घृणास्पद कारस्थान्यांना हेच दाखवून दिले आहे. जसे मुंबईच्या हल्ल्यात शहिद तुकाराम ओंबळे या पोलीस शिपायाने दाखवून दिले होते. आता वेळ प्रत्येक जबाबदार नागरीकांची आहे. सुजाण सुशिक्षीत जनतेने आपल्या आजुबाजूला जागरूकतेने परस्पर सदभावना बंधुत्वाची भावना बिघडणार नाही याची काळजी घेतली पाहीजे.

**जबाबदारीचे भान ठेवून वागायची ही वेळ**

देशभक्ती दाखविण्याची हीच वेळ आहे. (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -88,300 रु.+3% GST
सोने- 24 K -96,400 रु.+3% GST
चांदी- 01,0500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

।। चतुर्थ पुण्यस्मरण ।।



स्व.महेश शंकरलाल गिंदोडिया
स्वर्गवास दि.३० एप्रिल २०२१

सर्वांसाठी देह झिजविला
कष्टातुनी आनंद फुलविला
उरली नाही साथ आम्हाला
आठवण येते क्षणाक्षणाला..


: शोकाकुल :
कैलाश गिंदोडिया मोहन गिंदोडिया
दिलीप गिंदोडिया आनंद गिंदोडिया
सर्वेश गिंदोडिया एवं गिंदोडिया परिवार

फर्म : गंगाभीसन जीवनराम गिंदोडिया
के.डी.ॲण्ड कंपनी, धुलिया

# जगण्याचे जीवन तत्वज्ञान मांडणारे महात्मा बसवेश्वर यांची आज जयंती!

**महात्मा बसवेश्वर हे बाराव्या शतकातील वीरशैव लिंगायत संप्रदायाचे प्रसारक धर्मगुरू असून त्यांचा जन्म कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी या गावात ११३१ साली अक्षय्य तृतीयेला झाला. तत्कालीन मंगळवेढा राज्यावर कलचुर्य राजा बिज्जल राज्य करीत होता. महात्मा बसवेश्वर बाराव्या शतकात कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी या गावात ११३१ साली वैशाख शुद्ध तृतीया, (अक्षय्य तृतीया) या दिवशी ब्राह्मण अग्रहार प्रतिष्ठित कुटुंबात बसवेश्वरांचा जन्म झाला. काहींच्या मते तो इंगळेश्वर (जि.विजापूर) या गावी झाला असावा. त्यांच्या जन्मकाळाविषयी मतभेद असले, तरी सामान्यतः त्यांचा जन्म वैशाखातील अक्षय्य तृतीयेला ११३१ ला झाल्याचे मानले जाते. त्यांचे वडील मादिराज आणि आईचे नाव मादलांबिका होते.**

महात्मा बसवेश्वरांच्या मोठ्या भावाचे नाव देवराज व बहिणीचे नाव अक्कानागम्मा होते. वयाच्या आठव्या वर्षी ज्ञान मिळविण्यासाठी ते कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे गेले, ते वीरशैव प्राचीन अध्ययन केंद्र होते. तेथे महात्मा बसवेश्वरांनी काही वर्षे वास्तव्य केले. कूडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादींचा अभ्यास केला. त्यांचा विवाह त्यांच्या मामाच्या मुलीशी झाला. तेव्हा ते सोलापुरातील मंगळवेढा येथे आले. तेथे ते एकतीस वर्षे राहिले. महात्मा बसवेश्वर आणि शरण चळवळ,लिंगायत संत साहित्य-वचन साहित्य, लिंगायत शब्दाचा अर्थ, लिंगायत धर्म संस्कार, लिंगायत धर्म: मुख्य तत्त्वे, लिंगायत धर्म चळवळ, व्यवस्था परिवर्तन, महात्मा बसवेश्वरांचा संदेश, महात्मा बसवण्णांनी जनसामान्यांना सहज साधी शिकवण दिली. त्यांची शिकवण सामान्य माणसासाठी आहे. ती सहज साधी आणि सोपी आहे. संसारी माणसाच्या जगण्याचे जीवन तत्त्वज्ञान त्यांनी मांडले. ते घरोघरी जात. शरणूशरणार्थी करत. शरण कक्कय्या, हरळय्या, चेन्नय्या, नुलीय चंदय्या, मडिवाळ माचीदेव, व घटीवाळय्या या कष्टकरी, दीनदलित, आदिवासी, अठरा आलुतेदार, बारा बलुतेदार, यांना बसवण्णा एकत्र करू लागले. त्यांना सहज साधे जीवन तत्त्वज्ञान सांगू लागली एकाच देवाची इष्टलिंगाची साधना करा. देहच देवालय आहे. एकत्र या चर्चा करा. सुसंवाद करा. स्त्रियांना समान अधिकार द्या. पंचसूतके पाहू नका. दलितांना समान संधी द्या. जातीभेद, वर्णभेद, लिंगभेद करू नका. कोंबडे-बकरे कापू नका. स्वकष्टावर जगा. भिक्षा मागून खाऊ नका. काम कष्ट करा. कायकात कैलास आहे. दासोह समाजसेवा आहे. पर्यावरण रक्षण करा. दगडधोंडे पुजू नका. पुरोहिताच्याहस्ते देवपूजा करू नका. ज्योतिष, भविष्य, वास्तुशास्त्र, पंचांग पाहू नका. यज्ञ, होम-हवन करु नका. अनुभव मंटपात बसा. प्रश्न उत्तर करा, चर्चा करा. वचन साहित्य द्या. शुभाशुभ पाहू नका. नदी-स्नान करू नका. एकमेकांच्या पाया पडू नका. शरणूशरणार्थी म्हणा. संन्यासवादाचे उदात्तीकरण करू नका. संसारिक जीवन जगा. अस्पृश्यता पाळू नका. माणस-ाला माणसाप्रमाणे वागवा. पशुहत्या करू नका. मांसाहार करू नका व्यसनाधीन बनू नका. चोरी करु नका. हत्या करु नका. रागावू नका. खोटे बोलू नका. कोणाची घृणा करु नका. दया हाच धर्म आहे. सदाचाराने वागा. निती-नैतिकता आणि विवेकाने वागा. दयाच धर्माचा मूलमंत्र आहे. शरणांची थट्टा मस्करी करू नका. नवस-सायास करू नका. अंधश्रद्धा सोडून द्या. प्राणीमात्रावर दया करा. भुकेलेल्याला अन्न द्या. घोर जपतप करू नका. झोपच जप आहे. कठोर देहदंडण, इंद्रियदमन करू नका. देहाला कष्ट देऊ नका. देह कायकासाठी कष्टवा. उपवास-तापास, व्रतवैकल्ये करू नका. वेळेवर दिवस वर्ष यात भेद करू नका. प्रत्येक दिवस, वार शुभच आहे. मरण महानवमी आहे, त्याचे स्वागत करा. सुखी संसार करा, संसार सोडून हिमालयात जाऊ नका. संन्यास धारण करण्याची गरज नाही. मूर्तिपूजा सोडून द्या. अनावश्यक खर्च करू नका. काल्पनिक स्वर्ग-नरक यावर विश्वास ठेवू नका. सदाचार स्वर्ग आहे. अनाचार नरक आहे. देवघर गाव सोडून अन्यत्र भटकू नका. शेत पावनभूमी आहे. कष्टाची भाकरच महाप्रसाद आहे. जिवंत नागाला मारून चित्रातल्या नागाची पूजा करू नका, विसंगत व्यवहार सोडून द्या. निसर्गनियमाप्रमाणे देहधर्माप्रमाणे वागा. अनावश्यक देहाला त्रास देऊ नका. चारित्र्य सांभाळा. दासोह करा. गरजेपुरती संपत्ती बाळगू नका. फुकटचे कोणाला काही देऊ नका. फुकटचे कोणाचे काही घेऊ नका. दानधर्मापेक्षा दासोह महत्त्वाचा आहे. शिक्षण घ्या, वचने लिहा, वाचनसाहित्य वाचा. ज्ञानी व्हा, नैतिक बना, विवेकी बना, स्वतःमध्ये बदल करा. स्वतामधील दोष दूर करा. कर्मकांड दूर करा. स्वतःची स्तुती करू नका अशी सहज साधी शिकवण बसवण्णांनी दिली. आम-आदमीने ती आत्मसात केली आणि आचरणात आणले.



# महाराष्ट्रात फुललेले भ्रष्टाचाराचे बगिचे

(पान २ वरुन) तर त्या संकल्पकांचे जाहीर कौतुकच केले पाहिजे. त्यांना पद्मश्री देऊन गौरविले पाहिजे. तसेही या राज्यात होणे शक्य आहे. चोरांच्या हातात तिजोरीच्या चाव्या देण्यासारख्या काही घटना महाराष्ट्रात घडतात. त्यापैकी एसटी महामंडळाची एक घटना आहे. जेव्हा महाराष्ट्राचे नवे मंत्रिमंडळ आले. त्यांचे खाते वाटप बाकी होते. त्या काळात एसटी महामंडळाचा कारभार मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारित होता. परंतु त्यांना कळू न देता महामंडळातील अधिकाऱ्यांनी परस्पर १३१० बसेस कंत्राटाने घेतल्या होत्या. ज्या कंत्राट दारा कडून घेतल्या त्याला अवाजवी दर दिल्याने महामंडळाचे दोन हजार कोटींचे नुकसान झाल्याचे माध्यमाने उघड केले होते. त्यावर मुख्यमंत्र्यांनी अप्पर सचिवांची नियुक्ती करून चौकशीचे आदेश दिले होते. चौकशी अंती घोटाळा झाल्याचे उघडकीस आले. या प्रकरणाची संपूर्ण माहिती खुद्द मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिली होती. आणि योग्य ती कारवाई केली जाईल अशी ग्वाही देखील दिली होती. त्यानुसार सखोल चौकशीचे आदेश देण्यात आले खरे पण चौकशी अधिकारी म्हणून ज्यांचा घोटाळ्यात सहभाग होता किंवा त्यांच्यावर संशय होता त्यांचीच नियुक्ती करण्यात आली. म्हणजेच चोराच्या हातात तिजोरीच्या चाव्या. घोटाळा करू, आपणच खाऊ, आणि आपणच त्याची चौकशी करू. निर्दोष सुटू. अशा पद्धतीची नोकरशाही महाराष्ट्राला सध्या लाभली आहे. सरकारचे अशा कुठल्याच मुद्द्यांकडे लक्ष नाही. थोडीशी सवड मिळाली तर लोककल्याणाच्या कामाचे काहीतरी बोलले जाते. अन्यथा कुचकामी आणि गैर लागू विषयांवरच अधिक चर्चा होते. त्यासाठी लोकप्रतिनिधींना लोकांनी निवडून दिले आहे काय असा प्रश्न लोकांसमोर उभा आहे आणि त्याचे उत्तर त्यांना मिळत नाही. तरीही आपण महाराष्ट्र प्रगतिशील, पुरोगामी आणि शिवरायांचा आहे असे लाज लज्जा शिंक्यावर टांगून ठेवून बोलत असतो. धन्य धन्य!

## चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमांक/संसो/६८६/२०२५
दिनांक ७/४/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय धुळे
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय धुळे,
पिंपालेक कॉम्प्लेक्स, मोगलाई शाळा नं.१४ समोर, साक्री रोड,
धुळे., धुळे, धुळे, धुळे

एस.आर.एन.क्रमांक - DHL/01972/1860/25
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक - **चौ.अ.क्र.२५१/२०२५ महा/३९/२०२५**
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक - **जय तुळजाभवानी धर्मदाय बहुउद्देशीय संस्था धुळे तालुका व जिल्हा धुळे बाबत/**
न्यासाचा पत्ता - ७८/३७ वलवाडी, देवपूर, धुळे, धुळे, धुळे, धुळे, धुळे
अर्जदार - हिरालाल अमृत मोरे,

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, धुळे हे वर नमूद केलेला अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यायासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत वर्णन**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | Cash In Hand | 3507.00 |

**(अ) जंगम मिळकत : रोख रु. ३५०७/- मात्र,** (अक्षरी रुपये तीन हजार पाचशे सात मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस.किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत कालावधी किंवा स्वरुप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|

**(ब) स्थावर मिळकत : रोख रु. /- मात्र,** (अक्षरी : रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०४/०४/२०२५ रोजी दिली.

प्र.अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, धुळे

# पावणे दहा लाखांची रक्कम दुसऱ्याच्या खात्यात वर्ग; चौघांविरोधात गुन्हा

**नंदुरबार, (प्रतिनिधी)- दुधाळे शिवारातील कोकणी हिलमध्ये राहणाऱ्या बेबीबाई रमेश कोकणी यांच्या बँक खात्यातून नऊ लाख ब्याऐंशी हजार चारशे एकोणसत्तर रुपयांची अफरातफर केल्याने खळबळ उडाली असून अलिबाग जि रायगड येथील चौघांच्या विरोधात नंदुरबार शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

बचत खात्यातून नऊ लाख, ८२ हजाराची रक्कम. बेबीबाई यांच्या संमतीशिवाय दुसऱ्यांच्या कर्ज खात्यात वर्ग केली.या प्रकरणी अलिबाग येथील प्राथमिक शिक्षक पतपेढीचे तत्कालीन अध्यक्ष उदय शंकर गायकवाड, विद्यमान चेअरमन राजेश सुर्वे, सचिव संदेश पाटील व शाखाधिकारी दर्पण दिलीप दरेकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## CHANGE NAME

MY OLD NAME WAS
1) NAZNEEN JAFAR BEG
2) NAZMIN JAFAR BEG
MY NEW NAME IS
NAZNEEN BANO JAFAR BEG
ADDRESS- LANE NO.05 PARDI FIKET, NEAR GHADIYAL WALI MASJID, DHULE-424001

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे वलवाडी, ता.जि.धुळे शिवारातील भुमापन क्रमांक व उपविभाग २४/१/अ/१/ब पैकी प्लॉट नं.३५ चे एकूण क्षेत्रफळ १८० चौ.मी. यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ९० चौ.मी. यामध्ये लोडबेअरिंगचे बांधीव घराचे क्षेत्र ३६.५३ चौ.मी. अशी मिळकत तिची चर्तुसिमा खालील प्रमाणे :-

| यासी | मापे व | चतु:सिमा |
|---|---|---|
| पुर्व | ६ मी., | प्लॉट नं.३२, |
| पश्चिम | ६ मी., | रस्ता, |
| दक्षिण | १५ मी., | प्लॉट नं.३५ पैकी भाग, |
| उत्तर | १५ मी., | प्लॉट नं.३४. |

सदर सविस्तर नमूद केलेली मिळकत ही महसुल दप्तरी लताबाई दिनकर पाटील, रा.धुळे यांचे नावे व कब्जे ताबेउपभोगात आहे. सदर मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार आमचे अशिलांनी मिळकत मालकांशी केलेला असून त्याबाबतची बयाणा देखील दिलेला आहे व त्याप्रमाणे आमचे अशिल लवकरच खरेदीखत देखील नोंदविणार आहे.

वर नमूद मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारची मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा हक्क अथवा वित्त संस्था बॅका पतसंस्था यांचा सदर मिळकतीवर बोजा असल्यास मुळ कागदपत्रासह खालील पत्यावर ७ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत नोंदवावी. सदर मिळकती बाबत मुदतीत कोणाचीही काही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज, निर्वेज आहे असे समजून आमचे अशिल सदर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. सदर मुदतीनंतर आलेल्या तसेच वृत्तपत्रात परस्पर घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत असल्यास संपूर्ण कागदपत्रानिशी खाली दिलेल्या पत्यावर मुदतीत संपर्क साधावा. तसेच मुदतीत लेखी हरकत न घेतल्यास त्या अनुशंगाने होणाऱ्या खर्चास व परिणामास आमचे अशिल जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रावरून तसेच त्यांचे सांगितलेवरून त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दि.२९/०४/२०२५
**ॲड.तिर्थदास शामराव अमृतसागर**
जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे. मो.नं.७७०९५०५०५२

## CHANGE NAME

MY OLD NAME WAS
VALABAI SHAMRAO LASHKAR
MY NEW NAME IS
WALABAI SHAMRAO LASHKAR
ADD- GOVT. DAIRY ROAD, WATER TANK CHAKKAR BARDI, DHULE

## CHANGE NAME

MY OLD NAME WAS
JAGRITI NANABHAU PATIL
MY NEW NAME IS
JAGRUTI ATUL BEHERE
ADD- JAKHANE, TAL-SHINDKHEDA, DIST- DHULE

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना व सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** तुकडी जिल्हा धुळे पोट तुकडी तालुका धुळे पैकी मौजे वेल्हाणे येथील वेल्हाणे ग्रामपंचायत हददीतील ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक ७९५ त्यासी क्षेत्र ४५० चौरस फुट त्यासी चर्तुसीमा खालील प्रमाणे-

पुर्वेस- रस्ता, पश्चिमेस- घर नं.८००,
दक्षिणेस- रस्ता, उत्तरेस- घर नं.७९४

सदर वरील नमूद मिळकती ही श्री कैलास माणिक जावरे यांच्या मालकीची होती. ते मयत झाल्या नंतर सदर मिळकतीवर त्यांची पत्नी म्हणून उमाबाई कैलास जावरे यांचे नाव त्यांची मुले नामे (१) भगवान कैलास जावरे (२) निलेश कैलास जावरे (३) शिवप्रसाद कैलास जावरे यांच्या संमतीने नाव लागले. व आता सदर मिळकत त्याच्या ताबे उपभोगात आहे. सदर मिळकतीवर उमाबाई कैलास जावरे हे कर्ज घेत आहे. व त्यांनी शिवप्रसाद कैलास जावरे यांस भगवान जावरे व निलेश जावरे यांच्या संमतीने बक्षीसपत्र करुन देते आहे.

तरी सर्वांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील नमूद मिळकत संबंधी कोणाचाही काहीही हक्क, हितसंबंध, बोजा, तारण, गहाणसौदा, भाडेपट्टा, कर्ज लीज, खावटी हक्क, बक्षिस, दान, जनरल मुखत्यारपत्र, अदला-बदल वगैरे वा कुठलाही कोणत्याही प्रकारे हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांत संपर्क करुन हरकत नोंदवावी व सदर मिळकती संबंधीचे मुळ कागदपत्र दाखवून त्यांचे समाधान करावे. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निर्बोज आहे असे समजून आमचे अशिल पुढील कायम खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार व हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदर जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहितीवरुन आमचे मार्फत प्रसिध्द करण्यात आली असे. **धुळे, दिनांक- २९/०४/२०२५**

**ॲड.कमलेश आर.मोरे**
२८, बडगुजर प्लॉट, पारोळा रोड, धुळे, ता.जि.धुळे.
मो.नं.९९२३४९०४६९

## जाहीर नोटीस

आमचे अशिल साहेबराव भटू मोरे (न्हावी), रा.वर्धाने, ता.साक्री, जि.धुळे, ह.मु.रेल्वे स्टेशन रोड, नवापूर, जि.नंदुरबार यांचेकडून शिरीष आनंदा पाटील व सुमित शिरीष शेलार, रा.वर्धाने, ता.साक्री, जि.धुळे यांना तसेच इतर संबंधितांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे वर्धाने, ता.साक्री जि.धुळे शिवारातील शेतजमीन गट नं.१३५ क्षेत्र १ हे. ४९ आर. लागवडीलायक तसेच पो.ख.० हे. ५० आर. एकूण क्षेत्र १ हे. ९९ आर. ज्यासी आकार रु.१-१० पैसे.

या मिळकतीचे उताऱ्यावर पूर्वी आमचे अशिलाचे वडिलांचे नाव होते व आहे. मात्र शिरीष आनंदा पाटील व सुमित शिरीष शेलार, रा.वर्धाने, ता.साक्री, जि.धुळे यांनी खोटया व बनावट कागदपत्रांच्या आधारे आमचे अशिलाची दिशाभुल करून तुमचे नाव सदर मिळकतीचे ७/१२ उताऱ्यावर लावून घेतले आहे, त्याबाबतची माहिती आमचे अशिलांना मिळाल्यानंतर आमचे अशिलांनी तुम्हास रजि.पोस्टाने नोटीस पाठविली होती. सदरची नोटीस मिळून देखील तुम्ही आता सदर मिळकत विक्री करण्याचे तयारीत असल्याबाबत आमचे अशिलांना खात्रीलायक माहिती मिळालेली आहे.

त्यामुळे सदर मिळकतीबाबत त्यांना विक्री अगर कोणत्याही प्रकारचा कोणाशीही तब्दिलीचा व्यवहार करणेस काहीएक हक्क व अधिकार नाही. सदर वर नमूद मिळकत ही आमचे अशिलाचे मालकी व ताबे उपभोगातील आहे. अशा परिस्थितीत सदर वर नमूद मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार कोणाशीही करू नये. केल्यास तो बेकायदेशीर राहील व तो आमचे अशिल व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे

सदर जाहीर नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

**धुळे, दिनांक- २९/०४/२०२५**
**ॲड.जे.आर.चांदणे**
जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे. मो.नं.७७७४८३६९८१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन-** १) मौजे बाभळे ता.शिंदखेडा जि.धुळे येथील गट नं.१५४/१/१५४/२ पैकी प्लॉट नं.७ चे एकूण क्षेत्र ७५.०० चौ.मी. बखळ प्लॉट अशी मिळकत

| यासी | मापे व | चतु:सिमा |
|---|---|---|
| पूर्वेस | ५.०० मी., | प्लॉट नं.२, |
| पश्चिमेस | ५.०० मी., | ६ मी. रस्ता, |
| दक्षिणेस | १५.०० मी., | प्लॉट नं.६, |
| उत्तरेस | १५.०० मी., | प्लॉट नं.८. |

२) मौजे बाभळे ता.शिंदखेडा, जि.धुळे येथील गट नं.१५४/१/१५४/२ पैकी प्लॉट नं.८ एकूण क्षेत्र ७५.०० चौ.मी. बखळ प्लॉट अशी मिळकत

| यासी | मापे व | चतु:सिमा |
|---|---|---|
| पूर्वेस | ५.०० मी., | प्लॉट नं.२, |
| पश्चिमेस | ५.०० मी., | ६ मी. रस्ता, |
| दक्षिणेस | १५.०० मी., | प्लॉट नं.७, |
| उत्तरेस | १५.०० मी., | प्लॉट नं.८ |

३) मौजे बाभळे ता.शिंदखेडा जि.धुळे येथील गट नं.१५४/१/१५४/२ पैकी प्लॉट नं.९ चे एकूण क्षेत्र ६७.५० चौ.मी. बखळ प्लॉट अशी मिळकत

| यासी | मापे व | चतु:सिमा |
|---|---|---|
| पूर्वेस | ४.५० मी., | प्लॉट नं.२, |
| पश्चिमेस | ४.५० मी., | ६ मी. रस्ता, |
| दक्षिणेस | १५.०० मी., | प्लॉट नं.८, |
| उत्तरेस | १५.०० मी., | प्लॉट नं.१०. |

४) मौजे बाभळे ता.शिंदखेडा जि.धुळे येथील गट नं.१५४/१/१५४/२ पैकी प्लॉट नं.१० चे एकूण क्षेत्र १०१.२५ चौ.मी. बखळ प्लॉट अशी मिळकत

| यासी | मापे व | चतु:सिमा |
|---|---|---|
| पूर्वेस | ६.७५ मी., | प्लॉट नं.२, |
| पश्चिमेस | ६.७५ मी., | ६ मी. रस्ता, |
| दक्षिणेस | १५.०० मी., | प्लॉट नं.९, |
| उत्तरेस | १५.०० मी., | गट नं.१५४/१ |

येणे प्रमाणे वरील वर्णनाची आतील चारही (४) मिळकती या अक्षय प्रभाकर पाटील (गुजर) रा.मु.पो.सोनगीर ता.जि.धुळे यांच्या मालकीची व ताबेउपभोगातील असून त्यांचा कडून सदर चारही मिळकती या आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदापोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकती या निर्बोज, निर्वेध व अक्षय प्रभाकर पाटील (गुजर) यांच्या मालकीची असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींच अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. व परस्पर वर्तमानापत्रातून घेतलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधणकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. **धुळे, दि.२९/०४/२०२५**

**ॲड.ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाला बिल्डींगजवळ, मिलपरीसर, धुळे.
मो.नं.९४०५८१६४४९

## INTERVIEW

For Higher Secondary Section
BSc/MSc B.ed
BA/M.A B.ed
For Primary Section
D.ed
For Pre Primary Montessori is Compulsory
Should be fluent in English
Interview Date: 03/05/2025
Office Time: 9:00 am To 1:00 pm
Mariya English Medium school
Plot no. 137, 100 feet Road, Dhule.
Office Contact No: 9325767386 / 9823683385

## जाहीर नोटीसीस उत्तर

श्री.उज्वल केदारनाथ बंधान, रा.बालाजी मंदिरासमोर, ग.नं.४, धुळे यांना त्यांनी ॲड.दिलीप पी.सोनार यांचेवतीने दि.१८/४/२०२५ रोजी च्या दैनिक आपला महाराष्ट्र वर्तमानपत्रात दिलेल्या जाहीर नोटीसीस या जाहीर नोटीस उत्तराने कळविण्यात येते की,

सदर जाहीर नोटीसीत नमूद करण्यात आलेली मौजे बाळापूर, ता.जि.धुळे येथील गट नं.१२४/२, क्षेत्रफळ-२ हेक्टर ४० आर, आकार-१२ रूपये ७५ पैसे ही मिळकत आमचे अशील श्री.हेमंत हरीशचंद चौधरी व नोटीसीत नमूद अन्य दोन लोकांच्या मालकीची नाही. त्यामुळे वर नमूद मिळकती संदर्भात आमचे अशिलांचे नावे जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्या मिळकतीशी आमचे अशिलांचा दुरान्वये संबंध नाही.

जाहीर नोटीसीत नमूद मिळकतीबाबत आमचे अशिलांनी कोणताही सौदा करार उज्वल केदारनाथ बधान यांचेशी केलेला नाही. आमचे अशिलांशी झालेला अन्य सौदा करार हा दि.१०/१०/२०१४ मध्ये श्री.उज्वल केदारनाथ बधान यांचेशी झालेला होता व त्यासोबत त्या मिळकतीची साफसफाई त्यांचे मार्फत करण्यासाठी जनरल मुखत्यारपत्र करून देण्यात आलेले होते. सदरचा सौदा करार हा दि.१०/१०/२०१४ पासून ११ महिन्यात पूर्ण करण्याचे ठरलेले होते. परंतु श्री.उज्वल केदारनाथ बधान यांनी सदरचा सौदे करारातील अटी व शर्तीचे पालन केलेले नाही. याउलट सौदापावतीत नमूद व्यवहाराबाबत त्यांनी दिलेला धनादेश देखील अनादरीत झालेला होता. परंतु आमचे अशिल व बधान यांचे संबंध पाहून आमचे अशिलांनी धनादेश अनादर व फसवणूकीचा गुन्हा दाखल केलेला नाही. दि.१०/१०/२०१४ रोजी झालेला सौदा करार हा कालबाहय झालेला असून त्या सौदा करारतील मिळकतीशी श्री.उज्वल केदारनाथ बधान यांचा कोणताही काडीमात्र संबंध नाही कारण त्यांनी सदर सौदा करारातील सर्व अटी व शर्तीचा भंग केलेला असल्याने सदरचा सौदा करार हा रद्दबातलझालेला आहे व सौदा करार हा आमचे अशिल श्री.हेमंत हरीशचंद चौधरी व अन्य दोन लोकांवर व त्यांचे मिळकतीवर बंधनकारक नाही.

तरीही श्री.उज्वल केदारनाथ बधान यांना कळविण्यात येते की, तुम्ही दिलेली दि.१८/४/२०२५ रोजीची जाहीर नोटीस तातडीने मागे घ्यावी, अन्यथा आमचे अशिलांना योग्य ती कारवाई करणे भाग होईल, याची नोंद घेण्यात घ्यावी, होणाऱ्या खर्चास व परिणामास तुम्ही स्वत:जबाबदार रहाल.

**जाहीर नोटीसीस उत्तर देणारची सही**

सदर नोटीस आमचे अशिल श्री.हेमंत हरीशचंद चौधरी यांचे सांगणेवरून व माहितीवरून त्यांचेतर्फे आमचेमार्फत दिली असे. येणेप्रमाणे नोटीसीस जाहीर नोटीस उत्तर दिले असे. **धुळे, दिनांक- २९/०४/२०२५**

**ॲड.उमेशकांत गुलाबराव पाटील**
२१०, ॲडव्होकेट चेंबर्स, जिल्हा न्यायालय आवार, स्टेशनरोड, धुळे.
मो.नं.९९६०२९१०४८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवपूर, ता.जि.धुळे येथील सर्व्हे नं.६४/१अ+१ब+१क/२ पैकी प्लॉट नं.५८ चे क्षेत्र २७८.७० चौ.मी. यांस वि.सि.स.नं. २३०२ चे क्षेत्र २८० चौ.मी., सत्ता प्रकार 'क', यापैकी दक्षिणेकडील भागाचे ७/१२ उताऱ्या प्रमाणे क्षेत्र १३९.४० चौ.मी. व सि.स.उताऱ्या प्रमाणे क्षेत्र १४० चौ.मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : स.नं.६४/२, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं.५७, उत्तरेस : प्लॉट नं.५८ पैकी उर्वरित भाग. येणे प्रमाणे वर्णनाचे बखळ प्लॉट मिळकत श्री.राजेंद्र भगवंत शिंत्रे, रा.२८, शुभम पार्क अपार्टमेंट, साक्री रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिल श्री.शिरसाळे सुरेश लालचंद, रा.कापडणे, ता.जि.धुळे याच्यांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्युपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्टजप्ती, दावा, हितसंबंध वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबध असल्यास ते त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक- २९/०४/२०२५.
**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी - भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे.
मो.नं.९८२२८५२६५०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे महिंदळे, ता.जि.धुळे येथील स.नं.१०६/१/ब/२/३/४ पैकी प्लॉट नं.३२ चे एकूण क्षेत्र १६२.५० चौ.मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस प्लॉट नं.२३, २४, दक्षिणेस : प्लॉट नं.३१, उत्तरेस : प्लॉट नं.३३. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत सौ.मुस्कान कंवरलाल गलाणी, रा.०८, शिवसागर पार्क, साक्री रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, रक्कम देणे/घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक- २९/०४/२०२५.
**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी - भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे.
मो.नं.९८२२८५२६५०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे, ता.जि.धुळे येथील सिटी सर्व्हे नं.१९/अ/२०/१/अ/२०/१/ब यापैकी प्लॉट नं.१२ चे एकूण क्षेत्र १७२.५० चौ.मी. यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ९७.५० चौ.मी. यांसी चतु: सिमा पुर्वेस : प्लॉट नं.२५, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : याच प्लॉट नं.१२ पैकी उर्वरित भाग, उत्तरेस : रस्ता. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत श्री.अमीत रमेश शाह, रा.रूपा अपार्टमेंट, गणपती मंदिर रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिल श्री.जितेंद्र भाईदास पाटील, रा.अजंग, ता.जि.धुळे याच्यांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, रक्कम देणे/घेणे, कोर्ट वाद, साल्वन्सी, वैगरे असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक- २९/०४/२०२५.
**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी - भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे.
मो.नं.९८२२८५२६५०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या टायटल व्हेरीफीकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे ढंढाणे ता.जि.धुळे ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमीन गट नं.७३चे क्षेत्र ५ हे. ४२ आर पो.ख.०.३४ आर, आकार रू.६.६० पैसे एकूण क्षेत्र ५ हे ७६ आर यासी चर्तुसिमा गावनकाशाप्रमाणे.

येणे प्रमाणे मिळकतीचे मालक १.श्रीकांत प्रभाकर पाटील रा.धुळे ता.जि.धुळे २.कैलास बापुराव ठाकरे रा. मु.पो. वालखेडा ता.शिंदखेडा जि.धुळे ३.प्रशांत विजय सोनवणे रा.धुळे ता.जि.धुळे ४.गुणवंत वसंतराव निकम रा.गोंदेगाव ता.सोयगाव जि.छत्रपती संभाजीनगर. यांनी आमच्या आशिले यांच्यासोबत सौदा केला आहे. सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यानीशी लेखी हरकती नोंदवाव्यात. ०७ दिवसानंतर आलेल्या हरकती, लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राह धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचाही कोणतेही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन आमचेमार्फत प्रसिध्दीस दिले असे.

ठिकाण- धुळे,
दिनांक- २६/०४/२०२५.
**ॲड.उमेश व्ही.मुसळे**
प्लॉट नं.३१, कृष्णा सोसायटी, एकता नगर, नकाणे रोड, देवपूर, धुळे-४२४००२.
मो.नं.८४८३८७०६२८
८४८५८१६२८३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे धुळे, ता.जि.धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील.

७/१२ उताराप्रमाणे- स.नं.३९३/२ पैकी प्लॉट नं.३ चे एकूण क्षेत्र १८०.०० चौ.मी. यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ६१.३३ चौ.मी. बखळ प्लॉट.

सि.स.उताराप्रमाणे- सि.स.नं.१२६६४ चे एकूण क्षेत्र १७५.०० चौ.मी.यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ६१.३३ चौ.मी. बखळ प्लॉट हे साजीद अहमद शाहीद इरर्शाद अन्सारी, रा.धुळे. यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु: सिमा व मापे मंजुर नकाशाप्रमाणे.

मिळकतीचे मालक यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरूपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदे करार केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदापावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्यूपत्र, मुख्त्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणेप्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरून, माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे, दिनांक- २९/०४/२०२५.
**ॲड.दानिश अहमद अ.रऊफ (शेख)**
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८०फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे.
मो.नं.९८८१९२९४२४

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे विंचुर, ता.जि.धुळे येथील शेत १) गट नं.२४३/१/अ/१ चे क्षेत्र ला.ला.०० हे. ५३ आर, आकार रू.१.५१ पैसे २) गट नं.२४३/२/ब/१/अ चे क्षेत्र ला.ला. ०१ हे. ०२ आर, आकार रू.३.२५ पैसे ३) गट नं.२४३/२/ब/१/ब चे क्षेत्र ला.ला.०१ हे. ०३ आर, आकार रू.३.३० पैसे यांसी चतु:सिमा मंजुर गाव नकाशा प्रमाणे. येणे प्रमाणे वर्णनाची शेत मिळकती १) श्री.दिपक अरूण पाटील २) श्रीमती. भारती अरूण पाटील, दोघे रा.बोरविहीर, ता.जि.धुळे ३) सौ.नितल शंतनु पाटील, रा.तुळशिराम नगर, देवपूर, धुळे यांचे मालकीची व ताबेउपभोगातील असून त्यांनी नमूद शेत जमीनी/मिळकती कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्युपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्टजप्ती, दावा, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, हितसंबंध, देणे घेणे, वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्ये ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निर्बोज आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबध असल्यास ते त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज आहे, असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दिनांक- २९/०४/२०२५.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी-भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे.
मो.नं.९८२२८५२६५०

**पान १ वरुन**

## पीक विमा योजनेत बदल

एक नवीन इलेक्ट्रीक वाहन योजना राबविण्याचा निर्णय घेतला असल्याचे स्पष्ट करीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, या योजनेत प्रवासी वाहतुक करणाऱ्या इलेक्ट्रीक वाहनास मोठ्या प्रमाणात अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. काही प्रकारच्या इलेक्ट्रीक वाहनांना विशिष्ट मार्गावर टोलमुक्ती देण्याचा देखील निर्णय घेतला आहे. इलेक्ट्रीक वाहनांचे उत्पादन वाढले पाहिजे तसेच तसेच ही वाहने भारीत (चर्जिंग) करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण झाल्या पाहिजेत. त्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची अशी योजना आज मंत्रीमंडळाने मान्य केली आहे, अशी अशी माहितीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**पीक विमाबाबत मोठा निर्णय**

पीक विमा योजना आपण चालवत होतो. त्यामध्ये आपल्याला अनेक घोटाळे पाहायला मिळाले. आपण मागच्या वेळेस एक रुपयात पीक विमा योजना सुरु केल्यानंतर लाखो बेकायदेशीर अर्ज आपल्याला पाहायला मिळाले. यामुळे हजारो कोटींचा अपव्यय होतो. अशा प्रकारचे षडयंत्र काही लोकांनी केले. त्यामुळे गरजू शेतकरी वंचित राहिलेत. असा प्रकार पुन्हा होऊ नये. त्यामुळे सुधारित पद्धतीने पीक विमा योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. जेणेकरुन विमा कंपन्यांना नाही तर शेतकऱ्यांना लाभ झाला पाहिजे. त्यासोबतच मोठ्या प्रमाणात शेती क्षेत्रात गुंतवणूक करणे, शेतकऱ्यांना विविध आवश्यक गोष्टींमध्ये गुंतवणूक करण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**मंत्रीमंडळ बैठकीतील ११ महत्वाचे निर्णय**

१. टेमघर प्रकल्प, ता. मुळशी, जि. पुणे येथील उर्वरित कामे आणि धरण गळती प्रतिबंधक कामासाठी ४८८ कोटी ५३ लाखांच्या सुधारीत खर्चाला प्रशासकीय (जलसंपदा) मान्यता. २. मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियम, १९५१ अंतर्गत महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध नियम, १९६४ मधील नियम २७ (ब) (३) मधील तरतूदीमध्ये सुधारणा. भिक्षागृहातील व्यक्तींना ५ रुपये ऐवजी आता ४० रुपये प्रतिदिन देणार. १९६४ नंतर प्रथमच (महिला व बाल विकास) बदल. ३. एकछत्री योजनेअंतर्गत ओ.बी.सी., ई.बी.सी. आणि डी.एन.टी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपुर्व आणि मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाने सन २०२१-२२ ते २०२५-२६ या वर्षांकरिता निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत लागू करण्याचा निर्णय. ४. हडपसर ते यवत राज्य मार्गावरील सहा पदरी उन्नत मार्ग आणि अस्तित्वातील रस्त्याचे सहा पदरी बांधकाम करण्यास मान्यता. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून ५ हजार २६२ कोटी ३६ लाख खर्च करणार. ५. सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत महा इनविट (पायाभूत सुविधा गुंतवणूक संस्था) स्थापन करण्यास मान्यता. ६. महाराष्ट्र राज्यात जहाजबांधणी, जहाजदुरुस्ती सुविधा ाणि जहाज पुनर्वापर सुविधा विकसित करण्याबाबतच्या धोरणास मान्यता. ७. महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरणास मान्यता. ८. बेस वाहनांसाठी समुच्चयक धोरण. ९. सर्वसमावेशक पीक विमा योजनेत बदल करून केंद्र सरकारच्या अनिवार्य जोखीम बाबीवर आधारित पीक विमा योजना राबवणार तसेच कृषी क्षेत्रातील भांडवली गुंतवणूक वाढवण्यासाठी कृषी पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी योजना राबविणार. १०. आदिवासी विकास विभागातर्फे अनुसूचित जमातीसाठी सुरू असलेल्या योजनांच्या धर्तीवर विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजबांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याचा निर्णय. ११. इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती आणि भटक्या जमाती विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची मर्यादा १० लाख रुपयांवरून १५ लाख रुपये करण्याचा निर्णय.

## बिहारमधील महाबोधी महाविहार मुक्तीसाठी..

जसजसा मोर्चा पूढे सरकला तसतशी मोर्चेकऱ्यांची संख्या वाढत गेली. यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. संभाजी नगर ,मंदाणा व पाडळदा येथील महिला बौद्ध विहार मुक्तीसाठी या मोर्चात मोठ्या संख्येने सामील झाल्या होत्या. महाबोधी विहार मुक्त करा, भारत सरकार होश मे आवो, चा बीटीआर कायदा रद्द करा यासह सर्व महापुरुषांच्या जयघोष करणाऱ्या घोषणांनी सारा परिसर दणाणून गेला होता. निळे झेंडे, पंचशिलचे झेंडे आणि लाल झेंड्यांनी मोर्चे कऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले होते. शेवटी प्रांताधिकारी कृष्ण कांत कनारिया यांना महिलांसह शिष्टमंडळाने निवेदन दिले. याप्रसंगी प्रांताधिकारी यांनी निवेदन राष्ट्रपतींपर्यंत पोहचवू अशी ग्वाही दिली. हा मोर्चा यशस्वी करण्यासाठी छाया शिरसाठ, सोनल मोहिते, करूना बळसाणे, उषाबाई रणदिवे, रजनी बच्छाव, अलका जोंधळे, सिमा शिरसाठ, उषा खैरनार, अलका सामुद्रे, सोनल पाटोळे, अलका बिरारे, सुशिला आगळे, उषा इशी, भारती बिऱ्हाडे या अग्रगण्य महिलांनी तसेच जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते अरविंद कुवर, कॉ.इश्वर पाटील, प्रशिकचे अध्यक्ष सुनिल शिरसाठ, दिपक मोहिते, रघुनाथ बळसाणे, सामाजिक कार्यकर्ते रविभाऊ मोरे, छोटू कुंवर, सुरेंद्र कुवर ,गोटूभाऊ महिरे, दिनेश बि-हाडे, प्रदीप निकम, सुनिल पाटोळे, रतिलाल सामुद्रे, कॉ.सुनिल गायकवाड, कॉ.अनिल शिरसाठ, विष्णू जोंधळे, आबा निकुम, गजेंद्र निकुम, यादव कुवर, जितेंद्र बिरारे, विश्वास जगदेव, गौतम जगदेव, संजय बागले, सचिन पानपाटील, पितांबर बि-हाडे, मिलिंद अहिरे, साहेबराव ईशी, सुनिल बि-हाडे, अॅड.तुकाराम चित्ते, बापू घोडराज, नरेंद्र कुवर, संतोष कुवर यांनी प्रयत्न केले.

## जमिन मालकांनी मोबदला स्वीकारावा

नोटीस देण्यात आलेल्या आहेत. मात्र आजपर्यंत काही गटधारकांनी मोबदला स्वीकारलेला नाही. तरी ज्या गटधारकांनी मोबदला स्विकारलेला नाही. त्या गटधारकांनी १५ दिवसांच्या आत मोबदला स्वीकारण्यासाठी सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्रमांक १, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांच्या कार्यालयात योग्य त्या कागदपत्रांसह संपर्क साधावा. मुदतीत मोबदला रक्कम न स्वीकारल्यास, मोबदला रक्कम कायदेशीररीत्या न्यायालयात जमा करण्यात येईल. असेही सक्षम अधिकारी (भूसंपादन) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्रमांक १ सीमा अहिरे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

## पालकमंत्र्यांच्या हस्ते होणार ध्वजारोहण

नागरिकांना या शासकीय समारंभात सहभागी होता यावे. यासाठी १ मे रोजी सकाळी ७.१५ ते ९ या वेळेत ध्वजवंदनाचा किंवा इतर कोणताही शासकीय अथवा निमशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. जर एखाद्या कार्यालयाला अथवा संस्थेला आ-पला स्वतःचा ध्वजारोहण समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो सकाळी ७.१५ वाजेच्या पूर्वी किंवा ९ वाजेनंतर आयोजित करावा. असेही पापळकर यांनी कळविले आहे.

## सहा दरोडेखोरांना अटक

ऊर्फ सजिन निला भोसले, ( वय ३२ वर्षे), कनेश निला भोसले, वय ४० वर्षे, भुऱ्या निला भोसले, (वय ३० वर्षे), जैन जयदेव पवार, (वय ३५ वर्षे सर्व रा.जामदा, ता.साक्री जि.धुळे) अशांना ताब्यात घेतले. तसेच त्यांचेकडुन एकुण ५० हजार रुपयांची रक्कम व मोबाईल असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सदर गुन्हयातील उर्वरीत हरेष शामराव भोसले (वय ३५ वर्षे, सोनेश विनायक चव्हाण (वय २७ वर्षे, दोन्ही राहणार जामदा, ता.साक्री जि.धुळे यांना देखील ताब्यात घेण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश मिळाले असुन सर्व आरोपींना नंदुरबार शहर पोलीस ठाण्याचे स्वाधीन करण्यात आले आहे.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, परि. पोउपनि सुनिल भामरे, पोहेकॉ राकेश वसावे, बापु बागुल, विशाल नागरे, पोकॉ अभय राजपुत, दिपक न्हावी, आनंदा मराठे, सतिश घुले अशांनी केली आहे.

**पान १ वरुन**

## पो.अधि.श्रवण दत्त यांना सन्मानचिन्ह

पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह जाहीर झालेल्यांपैकी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवन दत्त. एस यांचे नाव असुन त्यांनी परभणी येथे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणुन कार्यरत असतांना एक क्लिष्ट गुन्हा उघड करुन गुन्हयाचा उत्कृष्ट तपास केला होता. तसेच सदर गुन्हयात आरोपींना शिक्षा झाली असल्याने त्यांना पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे. तसेच पोलीस हवालदार बापू निंवा वाघ यांना १५ वर्षाच्या सेवेचा अभिलेख उत्तम राखल्याबद्दल सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे. दि.१ मे रोजी महाराष्ट्र दिनी पोलीस मुख्यालय नंदुरबार येथे होणाऱ्या पथसंचालनावेळी पोलीस अधिकारी व अंमलदार यांना नंदुरबार जिल्हयाचे पालकमंत्री यांचे हस्ते पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

## बाभळे येथील भिल कुटुंबाची जमिन

यांच्या नावाची नोंद करण्यात आली. महसुल दप्तरी असलेली कागदपत्रे पाहिल्यानंतर भिल यांचे नाव पांढ-या शाहिने हटविण्यात आले. त्याठिकाणी लखन भिल यांच्या नावाची नोंद दिसते. सरकारकडून उदरनिर्वाहासाठी मिळालेली जमिन आम्ही विकलेली नाही. तरीही महसुल दप्तरी फेरफारच्या नोंदी करण्यात आल्या आणि आम्हाला भुमिहीन ठरविण्यात आले. जमिनीचा व्यवहार आणि नाव कमी होण्याच्या प्रक्रीयेबाबत आम्ही अनभिज्ञ आहोत. याबाबत तलाठी, मंडळ अधिकारी, तहसिलदार, प्रांतधिकारी यांच्याकडे वेळ-ोवेळी तक्रारी करण्यात आल्या. परंतु कुठल्याच पातळीवर कुणीही दखल घेतली नाही, असे म्हणत भिल्ल भाउ-बहिणींनी जिल्हाधिका-यांना निवेदन दिले. जमिन परत आमच्या नावे नोंदवुन ती कसण्यासाठी मिळवुन दयावी. नाहीतर आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करू, असा इशारा भिल्ल कुटुंबियाने दिला.

## घागरी, आंबे घेण्याची ग्राहकांची गर्दी

पुजन केले जाते. धान्याच्या राशीवर मातीची घागर ठेवुन त्यावर खरबुज, खरबुजावर पुरणपोळ, पुरणपोळीवर आमरसासह पंचप्नवान्न ठेवले जातात. त्यानंतर पुर्वजांना निमंत्रित केले जाते. अग्निकुंड पेटवुन त्यात पुरणपोळीसह आमरस आणि मिष्ठान्नाची आहुती दिली जाते. त्यामुळे हवेत पंचप्नवान्नाचा गंध दरवळतो आणि तो पुर्वजांपर्यंत पोहचतो. त्यामुळे पुर्वज समाधान व्यनत करीत आर्थिक उन्नतीसाठी आशिर्वाद देतात अशी धारणा आहे. अक्षयतृतीयेच्या दिवशी घागर पुजनासाठी मातीची घागर खरेदी करणे, खरबुज खरेदी करणे, पुरणपोळीसाठी हरभ-याची दाळ, गुळ, मैदा, आंबे खरेदी करण्यात आले. या खरेदीविक्रीमुळे लाखो रूपयांची उलाढाल झाली. सण साजरे करण्याबाबत यंदा नागरीकांमध्ये काहीसा उत्साह आहे. त्यामुळे बाजारात मोठया प्रमाणात मातीच्या घागरींची खरेदी झाली. स्थानिक कुंभारांसह परराज्यातुन आलेल्या व्यावसायिकांनी आकारमान लक्षात घेवुन ७० ते १०० रूपये किंमतीच्या घागरीची विक्री केली.

अक्षयतृतीयेच्या पुजनासाठी नागरीकांनी खरबुज आणि आंब्यांची मोठया प्रमाणात खरेदी केली. नदीपात्रात उत्पादीत होणारे खरबुज ३० ते ५० रूपये किलो या दराने विकले गेले. बाजारात कोकणातील हापुस आंब्यासह कर्नाटक, तामिळनाडू, केरळ आणि गुजरातमधील आंबे दाखल झाले. देवगड, पायरी, केशर, बदाम या प्रकारचे आंबे बाजारात विक्रिस आले. आकारमान आणि चव लक्षात घेवुन आंबे १०० ते १२० रूपये किलो या दराने विक्री झाले. अक्षयतृतीयेपासुन बाजारात आंब्याची मोठया प्रमाणात खरेदी-विक्री होईल. आवक वाढली तर दर घसरू शकतील, असेही विक्रेत्यांचे म्हणणे आहे.

## पांडव प्लाझामधील बेकायदा बांधकाम थांबवा

करणा-यांनी निरनिराळया व्यावसायिकांसाठी असलेले सार्वजनिक स्वच्छतागृह देखील बंद केले आहे. वाढीव बेकायदेशीर बांधकामामुळे पावसाळयात या भागात पाणी साचुन समस्या निर्माण होवु शकतात. इतर व्यावसायिकांचा विरोध असुनही संबंधित व्यावसायिक बेकायदेशीपणे बांधकाम करीत आहेत. हे बांधकाम रोखले जावे. सार्वजनिक स्वच्छतागृह सर्वांसाठी खुले व्हावे, अशी मागणी कैलास हेगडे, प्रदीप माळी, अनिल छाजेड, रणजित गाडगे यांनी केली आहे.

## रात्र वैऱ्याची आहे!

पण कुण्या धर्माच्या प्रार्थनास्थळासमोर जावून, कुणा अल्पसंख्य लोकांना धमकावून, त्यांच्या समोर उत्पाती वक्तव्य कृती करून आपण पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या मनसुब्यांना खतपाणीच घालत आहोत याचे भान काही अति उत्साही राजकीय नेते कार्यकर्त्यांना राहत नाही. या हत्याकांडाचा बदला घेताना दहशतवाद्यांना आणि त्यांच्या आश्रयदात्यांना कायमची अद्दल घडवण्यासाठी केंद्र सरकारला सर्वच विरोधीपक्षांनी पाठिंबा दर्शविला आहे. येत्या महिनाभरात केंद्र सरकारकडूनही त्याबाबत ठोस कृतीची अपेक्षा केली जात आहे. काश्मीरमध्ये घडलेल्या प्रसंगात सुरक्षेची जबाबदारी केंद्रीय गृहमंत्रालय आणि संरक्षण खात्याची आहे. मात्र काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी तर विधानसभेचे विशेष अधिवेशन घेवून निष्पाप पर्यटकांवर झालेल्या हल्ल्या संदर्भात देशवासीयांची माफी मागितली आहे. ही वेळ मन मोठ करुन समजूतदारपणा दाखविण्याची आहे. नफरती चिंटूकडून मात्र आता आगळीक होता कामा नये देशातील वातावरण सौहार्दाचे आणि शांतीचे रहायलाच हवे. कोणतेही धार्मिक जातीय वाद उकरून काढून हिंसा करण्याचे कारस्थान करणारांना सुजाण लोकांनी रोखायची ही वेळ आहे. किंबहूना सर्वानीच जबाबदारीचे भान ठेवून वागायची ही वेळ आहे. आपल्या चुकीच्या कृतीने पाकिस्तानी मनसुब्यांना खतपाणी घातले तर जात नाही ना? याचा सारासार विचार केला तर हा देश कुणालाच कधी हार जाणार नाही. रात्र वैऱ्याची आहे! भारतीय नागरीका, राजा सावध रहा!

# केंद्र सरकारचे नवीन कामगार कायदे भांडवलदारांसाठी वीज परिमंडळ कर्मचारी संघटनेचा मेळाव्यात दावा




**धुळे, दि.२९- प्रचलित कामगार कायदे रद्द करून राज्यशासनाने भांडवलदारांसाठी फायदेशीर ठरतील असे कायदे आणले आहेत. परंतु कर्मचारी,कामगारांचे हित लक्षात घेता कामगार हिताचे कायदे कायम राहवेत आणि त्यांची अंमलबजावणी व्हावी, यासाठी आपल्याला संघटीत व्हावे लागेल. एकसंघ झाल्याशिवाय आपण आपले हित साधु शकत नाही. संघटनेत नव्याने पदाधिकारी झालेल्यांनी सर्वांच्याच हिताचा ध्यास घ्यावा, अशी भावना व्यनत करण्यात आली. धुळयातील वाडीभोकर राडेलगत असलेल्या पद्मश्री टॉवरच्या सभागृहात खान्देशातील विज मंडळ कर्मचारी संघटनेचा मेळावा झाला. या मेळाव्यात नवनियुक्त पदाधिका-यांचा सत्कार झाला.**

खान्देशातील जळगाव-धुळे-नंदुरबार जिल्हयातील विज परिमंडळ कर्मचारी संघटनेचा मेळावा झाला. या मेळाव्यात नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या पदाधिका-यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेच्या जेष्ठ पदाधिका-यांनी सांगितले की, विज परिमंडळ कर्मचारी संघटनेची स्थापना २९ मार्च १९७८ ला झाली. तेव्हा पासून आजपर्यंत बहुजन कर्मचारी, कामगारांच्या संघटना काम करीत आहे. अलिकडे सरकारने कर्मचार्यांच्या हिताचे असलेले कायदे मोडीत काढून नवीन कायदे अस्तित्वात आणले आहेत. हे कायदे कामगार- कर्मचाऱ्यांऐवजी भांडवलदार वर्गाचे हित जोपासणारे आहे. त्यामुळे कामगार-कर्मचा-यांच्या व्यापक हितासाठी सर्वांनी एकत्र यावे. कुठल्याही प्रकारच्या वर्गवारीचा भेद आपल्या संघटनेत नाही. त्यामुळे आपण एकत्र येवुन आपल ताकद वाढवावी, असे आवाहन डॉ. संजय घोडके यांनी केले. यावेळी संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी सिताराम बोरसे, सरचिटणीसपदी संजय मोरे, सल्लागारपदी प्रेमानंद मौर्य, कार्याध्यक्षपदी सुर्यकांत जनबंधु, उपसरचिटणीसपदी मिलींद खंडारे, मुख्य संघटकपदी दयानंद हाडके, उपसरचिटणीस नवनाथ पोटभरे, सल्लागारपदी बी.टी.जाधव यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. त्यानंतर त्यांचा सत्कार झाला. व्यासपीठावर मजदूर युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.एस. पाटील, नरेंद्र जारोंडे, अनिल बोरसे,निरज वैरागडे, अनिल महाजन उपस्थित होते.

# मंदाणे येथे ग्रा.पं.इमारतीच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन

शहादा, दि.२९ (प्रतिनिधी)- तालुक्यातील मंदाणे येथे राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान अंतर्गत नूतन ग्रामपंचायत कार्यालय लोकार्पण सोहळा दि.३० एप्रिल बुधवार रोजी ११ वाजता आयोजित केला आहे. नूतन ग्रामपंचायत कार्यालय लोकार्पण आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून आ.डॉ.विजयकुमार गावित तर प्रमुख अतिथी म्हणून पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दीपकबापू पाटील, शहादा तालुका खरेदी-विक्री संघाचे चेअरमन मकरंद नगिन पाटील, शहादा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी विकास पुनाजी राठोड, उप अभियंता बी पी पावरा, विस्तार अधिकारी एम आर देव, शाखा अभियंता जी डी भावसार आदी उपस्थित राहणार आहेत.उपस्थित राहण्याचे आवाहन सरपंच सुशिलाबाई भिल, उपसरपंच शरद साळुंखे, सदस्य रावा भिल, कमलाबाई भिल, विश्वासराव पवार, इंदुबाई भिल, ओंकार पवार, इंदुबाई देवरे, धरमसिंग पावरा, वैजंताबाई भिल, नारायण भिल, मंगलाबाई सैंदाणे यांनी केले आहे.

**निधन वार्ता**

## कविलता पिंपळे



शहादा,दि.२९- नंदुरबार येथील सौ.कविलता लक्ष्मण पिंपळे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्या प्राचार्य लक्ष्मण बंडू उर्फ एल.बी.पिंपळे यांच्या धर्मपत्नी तर आ.आमश्या पाडवी यांचे स्विय सहाय्यक सुधीरकुमार ब्राम्हणे यांच्या थोरल्या भगिनी होत. त्यांच्या पश्चात दोन मुली, मुलगा, जावई, सुन असा परिवार आहे.

## बेबीबाई बेहेरे-पाटील



शहादा, दि.२९- शिंदखेडा तालुक्यातील विरदेल येथील गं.भा.बेबीबाई संभाजी बेहेरे -पाटील (६४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात जेठ, जेठांनी, मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या दिनेश संभाजी बेहेरे यांच्या आई व वैजाली येथील रहिवासी तालुका मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष संजय पाटील यांच्या सासू होत.

## जबनाबेन सोनवणे



शहादा,दि.२९- येथील साईबाबा नगर मधील जबनाबेन बन्सी सोनवणे (८४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, मुली, नातवंडे असा परिवार असून त्या भरत बन्सी सोनवणे व सुदाम बन्सी सोनवणे यांच्या आई होत.

**विकणे आहे**
अक्षय तृतियेच्या मुहूर्तावर 63x16 अशी जागा खरेदी करा व त्यावर मिळवा 440 स्क्वेअर फूट जागा अगदी मोफत! त्वरित संपर्क करा! (जागा धुळे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे)
-: संपर्क :-
7744010511
8888269758

**दुकान भाड्याने देणे**
दुकान भाड्याने देणे आहे. आग्रारोड पोलीस चौकीसमोर, सराफ बाजार, महाले रिजन्सीच्या खाली, एकूण १६०० स्क्वे. फूटचे दुकान भाड्याने देणे आहे.
महाले रिजेन्सी
7588318710

**पाहिजेत**
औषधांच्या होलसेल दुकानात माल लावणे, ऑर्डर काढणे, ऑर्डर घेणे इ.कामासाठी स्त्री/पुरुष पाहिजेत. इंग्रजीचे जुजबी ज्ञान आवश्यक. अनुभव असल्यास प्राधान्य. प्रत्यक्ष भेटावे!
फार्मेक्स डिस्ट्रीब्युटर्स
गल्ली नं.२, दिव्य ज्वेलर्सच्या पाठीमागे, धुळे

**प्लॉट विकणे आहे**
बिलाडी गट नं.२६४/१ पवन नगर येथील रोडटच ५००० चौ.फूट प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
8446124135

**घर विकणे आहे**
प्रमोद नगर सेक्टर-१, प्लॉट नं.५१ब- २५x६२=१५५० स्के. फूट यावर दुमजली सुस्थितीतील घर विकणे आहे.
मो.नं.९४२१६१९४६१

**पाहिजेत**
कंपनीचा माल ऑर्डरप्रमाणे (सॉर्टींग) करण्यासाठी मुली पाहिजेत. वेळ २ ते ६
-: संपर्क :-
एमआयडीसी, धुळे
8879442989

**पाहिजे**
रानडे मॅटर्निटी हॉस्पिटलसाठी सिस्टर पाहिजे.
-: संपर्क :-
डॉ.राजेश रानडे
खोलगल्ली, धुळे
9422289768

**टु इन बंगलो विकणे आहे**
(फक्त एक)
थी बी एच के फक्त उपलब्ध.
भुखंड : ९६० चौ. फुट
बांधकाम : १३०० चौ. फुट
-: संपर्क :-
साईट सुरत बायपास हायवे
साक्री रोड, धुळे
8600231475

**शिपाई पाहिजे**
राजवाडे मंडळाला ऑफिस कामाची माहिती असणारे अनुभवी तरुण, ४ शिपाई पाहिजे. गरजू उमेदवारांनी अर्जासह संपर्क साधावा.
राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
वेळ : स.१० ते १, सायं.५ ते ८

**पाहिजे**
हॉटेलसाठी मॅनेजर पाहिजे (संगणकचे ज्ञान आवश्यक)
आकर्षक पगार मिळेल
हॉटेल गौरव
मालेगावरोड, अग्रसेन चौक, धुळे
8698442361
8262022328

**घर विकणे आहे**
ग.नं.१, जुने धुळे येथील (मोठ्या पुला जवळ) मारुती मंदिराजवळील घर योग्य किंमत आल्यास विकणे आहे. त्वरित व्यवहारास प्राधान्य.
-: संपर्क :-
9822494081




**पाहिजेत**
१) पेट्रोल पंपासाठी मुले पाहिजेत - ५ पदे १० वी पास/नापास. पंपावर २-३ वर्ष काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य.
ध्रुव ऑटो सर्व्हिसेस
मुंबई-आग्रा रोड, अवधान, धुळे
फोन : 02562-295155, मो.9225640005
Emil ID : dhruvaautoservices555@gmail.com

**प्लॉट विकणे आहे**
प्लॉट साईझ 60x95 = 5700 sq.ft. पत्ता : नं.12 टागोर कॉलनी, श्रीरंग कॉलनी जवळ, दत्तमंदिर, देवपूर, धुळे. अपार्टमेन्ट, हॉस्पिटल्स, ऑफिस, क्लासेस, बंगला साठी उपयुक्त जागा.
संपर्क : 8805917092




हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०